मुंबई ते सिंधुदुर्ग असा रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यास जोडणारा ग्रीन फिल्ड कोंकण द्रुतगती महामार्गाच्या अंतिम आखणीस मान्यता..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०२३/प्र.क्र.२६९/रस्ते-८,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०६ जुलै, २०२३

**संदर्भ** :- शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०२१/प्र.क्र.२४७/रस्ते-८, दिनांक ०६.०९.२०२१.

**प्रस्तावना :-**

मुंबई ही भारताची आर्थिक व महाराष्ट्र राज्याची राजधानी असुन एक मोठे वाणिज्य व औद्योगिक केंद्र आहे. महाराष्ट्रातील कोकण विभाग हा पर्यटन, औद्योगिक व वाणिज्यीक कामांसाठी समृद्ध आहे. तसेच, गोवा राज्य ते कोकण भागातुन मुंबईकडे ये - जा करणाऱ्या पर्यटकांची व व्यावसायिकांची मोठी वर्दळ आहे. मुंबई - कोकण विभाग ते गोवा असे द्रुतगती महामार्ग झाल्यास औद्योगिक, पर्यटक व दैनंदीन दळणवळण गतीमान होऊन कोकण विभागाची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल.

सदर कोकण द्रुतगती महामार्ग रायगड जिल्ह्यातील, पेण, अलिबाग, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील, मंडणगड, दापोली, खेड, गुहागरमी, रत्नागिरी, लांजा, राजापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, इ. तालुक्यातुन प्रस्तावित आहे. या महामार्गामुळे निश्चितच कोकणातील उद्योगवाढीस चालना मिळून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

कोकण द्रुतगती महामार्ग प्रस्तावित झाल्याने देशातील दक्षिण प्रांतातील राज्यांसाठी मुंबई करीता जवळचा गतीमान मार्ग तयार होईल व यामुळे दक्षिणेकडील व उत्तरेकडील राज्यांना हा मार्ग जोडला जाईल. सदर महामार्ग नवी मुंबई येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळास जोडला जाईल, ज्यामुळे कोकण विभागातुन आंतरराष्ट्रीय प्रवास करणे सोयीस्कर होऊ शकेल.

याअनुषंगाने हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर कोकण विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी द्रुतगती महामार्ग करण्याविषयी दिनांक १४ मार्च २०२० रोजी राज्य शासनाकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रकल्प हाती घेण्याबाबत दोन्हीही सभागृहात निवेदन करुन घोषणा करण्यात आली. त्यासअनुसरुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास या प्रकल्पाचे तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अहवाल तयार करण्याबाबत दिनांक २० मार्च, २०२० च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते.

पुढे मा. मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या दिनांक २५.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील मंजूरीस अनुसरुन शासनातर्फे संदर्भिय शासन निर्णयान्वये "मुंबई ते सिंधुदुर्ग असा रायगड, रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्ह्यास जोडणारा कोकण द्रुतगती महामार्ग प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (MSRDC) 'अंमलबजावणी संस्था' म्हणून नेमणूकीस मान्यता देण्यात आली आहे."

यासअनुसरुन आता सदर ग्रीनफील्ड कोकण द्रुतगती महामार्गाची आखणी अंतिम करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठकीत प्रकल्प सल्लागारांना दिलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्वे व स्थळ पाहणी अंती विविध पर्यायी आखणींचा अभ्यास करून तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक प्राधान्य अशी आखणी खालील पॅकेजनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने, सर्वाधिक प्राधान्य अशी आखणी ही अंतिम आखणी म्हणून प्रस्तावित केली आहे.

त्यानुसार सदर महामार्गाची रुपरेखा खालील प्रमाणे आहे.

- प्रवेश नियंत्रीत ६ पदरी ग्रीनफील्ड द्रुतगती महामार्ग बांधणे.
- १०० कि. मी प्रतितास वेगासाठी महामार्ग संकल्पित करणे.
- सदर महामार्गासाठी १०० मीटर रुंद भूसंपादन करणे.

| पॅकेज क्रमांक | पॅकेज चे नाव | लांबी |
|---|---|---|
| I | पेण (बलवली गाव) ते रायगड / रत्नागिरी जिल्हा सिमा | ९५.४० कि.मी. |
| II | रायगड / रत्नागिरी जिल्हा सिमा ते गुहागर - चिपळुण (रत्नागिरी जिल्हा) | ६९.३९ कि.मी. |
| III | गुहागर - चिपळुण (रत्नागिरी जिल्हा) ते रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्हा सिमा | १२२.८१ कि.मी. |
| IV | रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्हा सिमा ते पत्रादेवी महाराष्ट्र / गोवा राज्य सिमा | १००.८४ कि.मी. |
| | | |
| | एकूण | ३८८.४५ कि.मी. |

सदर आखणी पर्याय हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुल्यांकन मॅट्रीक्स नुसार सर्वात श्रेयस्कर पर्याय (Most Preferable Option) असल्याने सदरहू आखणीस अंतिम आखणी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७०६१५४२०७८८१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by NIRANJAN ARVIND TE
Date: 2023.07.06 15:48:03 +05'30'

(निरंजन तेलंग)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.उप मुख्यमंत्री, यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य.
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सा.बां.), मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव (नगर विकास विभाग-१), मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नगर विकास विभाग-२), मंत्रालय, मुंबई

१५) प्रधान सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
१७) सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०
२१) सर्व मंत्रालयीन विभाग
२२) निवड नस्ती (रस्ते-८), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.